नियमित फौजदारी खटला क्र.२२४/२०१५
सरकार वि. अफरोज पठाण
नि.क्र.३५

सरकारतर्फे साक्षीदार क्र.१

नाव – इश्तियाक अब्दुल रहेमान

वय – ३४ वर्षे

व्यवसाय – कपाट कारखाना कारीगार

पत्ता – पिर मुसा नगर, नांदेड रोड, उदगीर

साक्षीदार यांचा शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री.ए.एस.कदम यांच्याद्वारे सुरुः–

मी माझ्या मित्र अब्दुल गफार याच्या लग्नात गेलो होतो. त्यावेळी रात्री जी वेळ होती त्यावेळी मी रस्त्यावर बसलेलो होतो. मी मंडपामध्ये असताना आरोपी तेथे आला व मला मारले. त्याने मला चाकुने डाव्या हाताच्या मनगटावर, डोक्यावर व उजव्या पायाच्या गुडघ्यावर घाव केले. पहिले त्यांचे काहीतरी वाद होते, त्यातून येऊन त्यांनी हल्ला केला. त्यावेळी माण्या मित्राच्या घरातील सर्व पाहून आले होते. मी त्यानंतर घरी गेलो. माझ्या बायांसोबत मी पोलिस स्टेशनला गेलो. मी पोलिसांना सांगितल्याप्रमाणे पोलिसांनी माझी फिर्याद लिहून घेतली. मला माझी फिर्याद वाचून दाखवली, त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे आहे. त्यावर माझी सही आहे. त्याला **नि.क्र.३६** देण्यात आला. मी दिलेली फिर्याद पोलिसांनी संगणकावर नोंदवली. संगणकावर नोंदवलेली फिर्यादीची प्रत मला दाखवली. **(सदर केसच्या कामी संबंधीत पोलीस स्टेशनने सादर केलेला चाकू हा वर्णनात असलेल्या चाकू प्रमाणे दिसून आलेला नाही. सबब, संबंधीत कारकुनाने आपला शेरा सादर केला असल्याने संबंधीत पोलीस**

**नियमित फौजदारी खटला क्र.२२४/२०१५**
**सरकार वि. अफरोज पठाण**
**नि.क्र.३५**

स्टेशनला त्याबाबत स्पष्टीकरण सादर करण्यासाठी नोटीस देण्यात येते. त्यामुळे पुढील तारखेपर्यंत सरतपास तहकूब करण्यात येतो.)

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.12.04 16:42:37 +0530

ठिकाणःउदगीर न्यायदंडाधिकारी प्र.व.
दिनांकः०४/१२/२०२५ (न्यायालय क्रं. १), उदगीर.